भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500 FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL
15 MAR 2024

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CK 139800

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे

## // करारनामा //

### पे अॅण्ड पार्क अधिकार देणेकरिताचा करारनामा

हा करारनामा मुक्काम 'भाईदर, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र राज्य येथे आज दिनांक ------- माहे मार्च सन 2024 रोजी करण्यात आला.

उप-आयुक्त
मिरा-भाईदर महानगरपालिका
भाईदर (पश्चिम)

प्रथम पक्षिय
(हयापुढे सोईचे दृष्टीने
"महानगरपालिका" असा उल्लेख केला आहे.)

आणि

मे. ओम साई सिध्दी
शॉप नं 12, किंजल ला विस्टा
पुनम सागर कॉम्पलेक्स,
मिरारोड (पू.) ठाणे ४०१ १०७

द्वितीय पक्षिय
(हयापुढे सोईचे दृष्टीने
"एजंट / ठेकेदार" असा उल्लेख केला आहे.)

यांच्यामध्ये होत आहे.



For OM SAI SIDDHI
Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500 FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL
15 MAR 2024

महाराष्ट्र MAHARASHTRA 2023

CK 139801

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे
1 1 MAR 2024
दुय्यम प्रमुख लिपीक / लिपीक

ज्याअर्थी, मिरा-भाईंदर महानगरपालिका ही नागरी संस्था, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदीनुसार स्थापन झाली आहे आणि त्यांचे मुख्य कार्यालय स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) 401101 येथे आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 243(अ) अन्वये महानगरपालिका क्षेत्रातील वाहतुक पोलीस व आर.टी.ओ. इत्यादींशी विचारविनिमय करून मिरा भाईंदर शहरासाठी सार्वजनिक जागेवर "पैसे भरा आणि वाहने उभे करा" (पे अ‍ॅन्ड पार्क) या तत्वावर वाहने उभी करून ठेवण्याच्या किंवा थांबविण्याच्या जागा/ ठिकाणे प्रस्तावित केली आहे आणि त्यासाठी वाहन चालक/मालकांकडून वाहने, नमुद वेळेत, नमुद ठिकाणी वाहने उभी करण्यासाठी आकारावयाचे शुल्क (पार्कींग चार्जेस) वसुल करण्यासाठी मा महासभा दि.08/12/2017 ठराव क्र. 34 अन्वये दर मंजुर करण्यात आले आहेत.

ज्याअर्थी, महानगरपालिकेने (अ) मिरारोड स्टेशनजवळ, मिरारोड (पू) या जागेतील आरक्षण क्र.184 क्षेत्र 2591.81 चौ.मी. व (ब) मिरारोड रेल्वे स्टेशन समांतर रस्त्यावर स्काय वॉक खाली (सब स्टेशन व स्काय वॉक लॅडींगजवळ) येथील वाहनतळ, या जागी परिशिष्ट 'डी' मधील नमुद पार्कींग क्षमतेसाठी खाजगी संस्थेमार्फत दोन वर्षाच्या कालावधीसाठी पे अ‍ॅण्ड पार्क योजना राबविणेकरीता आणि वाहन चालक/मालकांकडून पार्कींग चार्जेस वसूल करणे या प्रस्तावासाठी दि.16/02/2024 रोजीच्या "दै.



For OM SAI SIDDHI

Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

15 MAR 2024

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CK 139802

11 MAR 2024

नालंदा एक्सप्रेस व दि.18/02/2024 रोजीच्या दै. पुण्यनगरी" या वृत्तपत्रातून निविदा मागविलेल्या होत्या.

आणि ज्याअर्थी ठेकेदार हयांनी "पैसे भरा आणि वाहने उभी करा" (पे ॲन्ड पार्क) योजना नूसार, निविदा फॉर्म व पुस्तिकेमध्ये विस्तृतपणे वर्णन केलेल्या जागेत वाहनतळ चालविणेसाठी महापालिकेस दि.23/01/2024 रोजी प्रस्ताव प्रस्तुत केला आहे.

आणि ज्याअर्थी एजंट/ठेकेदार यांनी निविदा फॉर्म व पुस्तिकेमध्ये विस्तृत वर्णन केलेल्या वाहन तळाच्या जागेत "पैसे भरा आणि वाहने उभी करा" या तत्वावर ठेका चालविणेत असलेली योग्यता व क्षमता, काम करणेसाठी असलेला रस व तीव्र इच्छा पाहून महानगरपालिकेने ठेकेदार यांचा प्रस्ताव स्विकारला आहे.

आणि ज्याअर्थी प्रस्ताव दस्तऐवजांमध्ये नमुद केलेल्या अटी, शर्ती, निर्देश आणि सुचनांचे योग्य रितीने पालन करण्याची सर्व जबाबदारी एजंट/ठेकेदार हयांची आहे.

त्याअर्थी सदरचा करारनामा साक्षीदारांच्या समक्ष करण्यात येत असून उभयपक्षांमधील मान्य व कबुल करण्यात येत आहे. ते खालीलप्रमाणे -

अटी व शर्ती



For OM SAI SIDDHI

Proprietor

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

INDIA NON JUDICIAL

15 MAR 2024

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CK 139803

11 MAR 2024

ठाणे

**अे) कराराची व्याप्तीः -**

१) हा करारनामा खालील नमुद केल्याप्रमाणे ठराविक / विनिर्दिष्ट ठिकाणी दर्शविलेल्या वाहनतळाच्या जागेत (पे ॲन्ड पार्क) योजना चालविण्यासाठीचे अधिकार प्रदान करण्यासाठी आहे.

| ठिकाण | वाहन क्षमता (एका वेळेची) |
|---|---|
| (ए) मिरा रोड स्टेशनजवळ मिरारोड (पू.) या जागेतील आरक्षण क्र.184 | 742 |
| (बी) मिरारोड रेल्व स्टेशन समांतर रस्त्यावर स्काय वॉक खाली (सब स्टेशन व स्काय वॉक लॅडींगजवळ) | 146 |
| एकूण | **888** |

२) वरील नमुद वाहनतळावरील वाहनांकडून महानगरपालिकेने वेळोवेळी काढलेल्या सुचना पत्रानुसार लागू केलेल्या दरांप्रमाणे "पैसे भरा आणि वाहने उभी करा" शुल्क वसुल करण्यास एजंट /ठेकेदार यांना कायदेशिर अधिकार देण्यात येत आहेत

२) ठेकेदार यांनी वरील प्रमाणे विनिर्दिष्ट केलेल्या जागेव्यतिरिक्त कोणतीही अतिरिक्त जागा किंवा ठिकाणां



**For OM SAI SIDDHI**

Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500
FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये
Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL

15 MAR 2024

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐

CK 139804

जिल्हा मुद्रांक कार्यालय, ठाणे
11 MAR 2024
मुद्रांक प्रमुख लिपीक / लिपीक

३) चा पार्किंगसाठी वापर करू नये तसे केल्यास, सदर ठेकेदार यांनी या निविदेच्या नियमांचे उल्लघंन केले आहे असे मानून प्रथम पक्षीय यांनी निर्देशित केलेली कारवाई ठेकेदार यांस बंधनकारक राहील.

४) एजंट/ठेकेदार मान्य व कबूल करतात की, महापालिकेच्या मंजुरी शिवाय याठिकाणी दिलेल्या करारातील फायदे आणि विशेष हक्क किंवा त्यातील काही भाग व त्यातील कोणतेही हित संबंध इतर कोणत्याही व्यक्तीस किंवा व्यक्तींना एजंट/ठेकेदार हस्तांतरण किंवा पोट भाडयाने देणार नाहीत.

**बी) कराराचा कालावधी आणि सुरुवात :-**

१) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील निविदा पुस्तिकेमध्ये दर्शविलेल्या जागेवर पे ॲण्ड पार्क चालविणेकरीताचा कालावधी एकूण 2 वर्षाचा राहिल. सदर 2 वर्षाचा कालावधी करारनामा व कार्यादेश केल्याच्या दिनांकापासून गणला जाईल. (कार्यादेशात नमुद केल्याप्रमाणे) ठेकेदार यांनी 2 वर्षामध्ये भरणा करावयाची महसूल रक्कम वेळोवेळी भरल्यास व अटीशर्तीचा कोणताही भंग न केल्यास व त्यांचे काम महानगरपालिकेस समाधानकारक वाटल्यास किंवा काही कारणास्तव आवश्यकता वाटल्यास प्रथम पक्षिय यांस सदर करारनाम्याच्या कालावधीची मुदत वाढविण्याचा अधिकार राहिल.



For OM SAI SIDDHI

Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500 FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL

15 MAR 2024

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CK 139805

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे
11 MAR 2024
प्रमुख लिपीक / लिपीक

२) एजंट / ठेकेदार मान्य करतात की, सदर कराराच्या तारखेपासून वाहनतळाची जागा "पे अॅन्ड पार्क योजना" चालविणेसाठी ताब्यात घेतील त्यापूर्वी महानगरपालिकेस सुरक्षा अनामत रक्कम जमा करतील आणि त्याप्रमाणे महापालिकेस लेखी कळवतील आणि तसे न केल्यास कोणतीही सुचना न देता E.M.D. व सुरक्षा ठेव रक्कम (Security Deposit) जप्त करण्याचे अधिकार महानगरपालिकेला राहतील.

**सी) पे अॅण्ड पार्कसाठी मंजूर केलेली दरसुची :-**

1. एजंट ठेकेदार मान्य करतो की, निविदा पुस्तिकेत दर्शविलेल्या पे अॅन्ड पार्क दरसुची प्रमाणे पैसे वसूल करील.

| अ.क्र | वाहने | तास व रुपये | तास व रुपये | तास व रुपये | रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | खाजगी वाहने | 6 तासाकरिता | 12 तासाकरिता | 24 तासाकरिता | महिन्याचा पास |
| i | सायकल | रु.3 | रु.5 | रु.10 | रु.150 |
| ii | दुचाकी वाहन | रु.15 | रु.20 | रु.25 | रु.350 |



For OM SAI SIDDHI
Proprietor

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

INDIA NON JUDICIAL

15 MAR 2024

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CK 139807

11 MAR 2024

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | व्यवसायीक वाहने | | | | |
| i | दुचाकी/तीन चाकी/चार चाकी (टॅक्सी, टेंपो इ. हलकी वाहने) | रु.60 | रु.100 | रु.150 | रु.2000 |
| ii | चार/सहाचाकी वाहने (ट्रक, बस, टुरीस्ट बस इ. जड वाहने) | रु.70 | रु.125 | रु.175 | रु.4000 |

2. एजंट / ठेकेदार मान्य करतात की, कोणत्याही परिस्थितीत उपरोक्त वाहने उभी करण्याचे दर वाढविले जाणार नाहीत. एजंट / ठेकेदार मान्य करतात की, वाहनतळाची जागा २४ तास वाहने उभी करण्याकरीता खुली ठेवण्यात येईल व महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दराप्रमाणेच पार्किंग फी वसूल करेल. तसेच कोणाकडूनही वाढीव रक्कम एजंट / ठेकेदार घेणार नाही. तशी तक्रार प्राप्त झाल्यास महानगरपालिकेकडून करण्यात येणारी कारवाई एजंट /ठेकेदार यांना मान्य असेल.
3. एजंट/ठेकेदार मान्य करतो की, कोणत्याही व्यक्तीस प्राधान्य न देता कटाक्षाने प्रथम येणा-यास प्रथम सेवा तत्वावर गाडी उभी करण्यास परवानगी देईल. कोणत्याही कंपनीच्या,



For OM SAI SIDDHI

Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500 FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL
15 MAR 2024

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CK 139808

11 MAR 2024

कोणाही विशिष्ट व्यक्ती/व्यक्तींना मासिक परवाना पध्दती व्यतिरिक्त गाडया ठेवण्यास (उभ्या करण्यास) वाहनतळाची कोणतीही जागा/ठिकाणाचे आरक्षण देणार नाही असे एजंट / ठेकेदार मान्य करतात. तसेच मनपाची वाहने किंवा सरकारी वाहने पे ॲन्ड पार्क मध्ये उभी केल्यास त्याबाचतचे कोणतेही शुल्क ठेकेदार घेणार नाही.

तसेच दरसुची पेक्षा जास्त पैसे ठेकेदार यांनी वसुल केल्याचे निदर्शनास आल्यास अनुसुची '१' मध्ये निश्चित केल्याप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

**डी) पे ॲन्ड पार्क योजना चालविण्यासाठी लागणारी साधने :**

१) सदर वाहनतळाच्या जागेमध्ये महानगरपालिकेने मंजुर केलेले दराप्रमाणे वाहने उभे करण्याचे शुल्क दर्शविणारे फलक प्रदर्शित करणे व त्याची देखभाल करणे एजट/ ठेकेदार हयांना मान्य व कबूल आहे.

"ही मिरा भाईंदर महानगरपालिकेची वाहनतळाची जागा आहे" असे दर्शविणारी इंग्रजी व मराठी मध्ये आवश्यक असणारे फलक वाहनतळाचे जागेच्या दर्शनीय भागात प्रदर्शित करणे व याची देखभाल करणे हे एजंट / ठेकेदार हयांना मान्य व कबुल आहे.



For OM SAI SIDDHI

Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500
FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये
Rs. 500
INDIA NON JUDICIAL
15 MAR 2024

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐

CK 139809

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे
11 MAR 2024
मुख्य प्रमुख लिपीक / लिपीक

"उभी करण्यात आलेले वाहने ही वाहन मालकाच्या स्वतःच्या जोखमीवर उभी करण्यात आलेली असून कोणत्याही कारणाने वाहनतळावरील जागेत उभी केलेल्या वाहनांस कोणत्याही कारणाने कोणतेही नुकसान, हानी किंवा चोरी झाल्यास त्यास महानगरपालिका किंवा एजंट / ठेकेदार जबाबदार राहणार नाही. असे दर्शविणारे फलक प्रदर्शित करणे व लावणे व त्याची देखभाल करणे एजंट/ ठेकेदार हयांना मान्य व कबुल आहे.

वरीलप्रमाणे फलक न लावल्याचे किंवा त्याची देखभाल न झाल्याचे महानगरपालिकेच्या निदर्शनास आल्यास ठेकेदारास रु.२०००/- दंड (प्रती दिन) आकारण्यात येईल.

२) एजंट/ठेकेदार मान्य करतात की, कार्यादेशामध्ये नमूद दिनांक व वेळेत पे ॲन्ड पार्क योजना चालविण्यासाठी लागणारी सर्व साधने वाहनतळाच्या जागेत बसवून वाहनतळाची जागा ताब्यात घेतील व पे ॲण्ड पार्क नागरिकांकरीता बाहन उभे करण्यास खुले करतील आणि तसे न केल्यास कोणतीही सुचना न देता E.M.D. तसेच सुरक्षा ठेव (Security Deposit) जप्त करण्याचे हक्क महानगरपालिकेला आहेत.

३) अशा प्रकारचे वाहनतळाचे विकसित करण्याचे काम करीत असताना महापालिकेच्या मालमत्तेस काही नुकसान झाल्यास, एजंट/ठेकेदार हे महापालिकेच्या समाधानार्थ त्याची



For OM SAI SIDDHI

Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500
FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये
सत्यमेव जयते
Rs. 500
INDIA NON JUDICIAL
15 MAR 2024
महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐
CK 139810
जिल्हा कोषागार कार्यालय
11 MAR 2024
मुद्रांक प्रमुख लिपीक / लिपीक

पुर्नः स्थापना करतील. सदर पुनःस्थापना किंवा दुरुस्ती करीताचे होणारे सर्व खर्च सदर एजंट/ ठेकेदार हेच करतील. महापालिका ही सदर दुरुस्ती/पुनःस्थापने करीता कोणतीही रक्कम सदर एजंट/ ठेकेदार यांना देणार नाही.

४) वाहनतळाच्या जागेवरील फर्निचर म्हणजेच पार्कींग-नो पार्कींग चे फलक, वाहनतळाच्या जवळील रस्त्यावरील मार्गदर्शक खुणा, चालू अवस्थेत असलेली सी.सी.टीव्ही,चौकी (Stall) आणि पे अॅन्ड पार्क योजना योग्यरितीने कार्यान्वित (सुरु) व्हावी म्हणून दक्षता घेण्यासाठी व इतर आवश्यक सर्व गोष्टी करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

**इ) देखभाल व दुरुस्ती :**

१) पे अॅन्ड पार्क योजना सुरू होण्यापुर्वी महापालिका वाहने उभी करण्याची पावती पुस्तिका ठेकेदार यांनी स्वतः छापून घ्यावयाची आहे. परंतु सदरची पुस्तिकेचा मसुदा महापालिकेकडून अंतीम करुन घेणे ठेकेदार यांच्यावर बंधनकारक राहिल. सदरची वाहने उभी करण्याचे पावतीमध्ये अनुक्रमाकांसोबत स्थळप्रत, पे अॅन्ड पार्क योजनेचे ठिकाण दर्शविणे, महापालिका व प्राधिकृत एजंट/ठेकेदाराचे नाव, वाहन क्रमांक, आत येण्याची व बाहेर जाण्याची वेळ, वाहने उभे करण्याचे मंजुर दराची यादी, जी.एस.टी.क्रमांक व जीएसटी ची रक्कम आणि "वाहने वाहन मालकीचे जोखमीवर उभी करणे" असे



For OM SAI SIDDHI
Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500 FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL
15 MAR 2024

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CK 139811

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे
11 MAR 2024
दुय्यम लिपीक / लिपीक

दर्शविणारी सुचना इत्यादींचा सदर पावती पुस्तिकेमध्ये सामावेश असेल. सदर पावती पुस्तिका छापण्यासाठी येणारा खर्च ठेकेदार यांनी करावयाचा आहे. तसेच एजंट/ठेकेदार यांना 25 टक्के पासेस देण्याची अनुमती राहिल.

२) वाहनतळाची जागा वाहने उभी किंवा पार्किंगसाठीच वापरण्यात यावी. त्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही गोष्टीसाठी जागेचा वापर करणार नाहीत असे एजंट/ ठेकेदार मान्य करतात. तसेच सदरची जागा स्वच्छ, व्यवस्थित व चांगल्या स्थितीत ठेवण्याची जबाबदारी ठेकेदार यांची राहील.

३) वाहनतळाची देखभाल करणे आणि "पैसे भरा वाहन उभे करा" योजना (पे ॲन्ड पार्क) चालविणे याकरीता लागणारा कर्मचारी वर्गाची नेमणूक व कर्मचाऱ्याचा खर्च ठेकेदार यांनी करावयाचा आहे. जबाबदार व्यक्तीचे/व्यवस्थापकांचे नाव मनपास कळविण्याची जबाबदारी एजंट/ ठेकेदार यांची राहील. तसेच आवश्यक चौक्या, आणि "पैसे भरा वाहन उभे करा" योजनेसाठी आवश्यक त्या इतर सुविधा यासाठी लागणारा सर्व खर्च एजंट / ठेकेदार यांना करणे बंधनकारक राहिल.

४) एजंट/ठेकेदार त्यांचे देखरेखीखाली गाडी उभी करण्याचे कामावर लक्ष देता याचे म्हणून नीटनेटका गणवेषधारी कर्मचारी वर्गाची नेमणुक करतील असे मान्य करतात.



For OM SAI SIDDHI

Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500
FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये
Rs. 500
INDIA NON JUDICIAL
15 MAR 2024

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CK 139812

११ MAR 2024

५) वाहनतळावर ठेकेदार यांनी नेमणुक केलेल्या कर्मचारी यांनी वाहनतळात असलेल्या वाहनांस कोणतेही नुकसान किंवा हानी केल्यास त्यास महापालिका जबाबदार राहणार नाही, त्यास ठेकेदार जबाबदार राहील.

६) मानवी आरोग्यास व जिवितास धोकादायक असणा-या आजारांची, संसर्गजन्य आजाराची किंवा लागण झालेल्या कोणत्याही व्यक्तीस कर्मचारी म्हणून कामावर ठेवणार नाहीत असे ठेकेदारास मान्य आहे.

७) एजंट/ठेकेदार मान्य करतात की, प्रत्येक वेळी बालकामगार अधिनियम, किमान वेतन कायदा व इतर साधर्म्य असणा-या अधिनियमांचे, फेर अधिनियमांचे, उपविधी, नियम व त्यांच्या बदलांचे नियमित पालन करतील. तसेच सदर अधिनियमांच्या तरतुदींचे उल्लघंन करून अशा कोणत्याही व्यक्तीस कामाबर नेमुन गाडयांवर वाहनतळाचे जागी काम करण्यास परवानगी देणार नाहीत व तसेच गुन्हेगारी यादीत नोंद असलेल्या कोणत्याही व्यक्तीस ठेकेदार वाहनतळावर कर्मचारी म्हणून नेमणुक करणार नाहीत.

८) या कराराचे मुदतीत सदर एजंट वाहनतळाच्या जागेची देखभाल व दुरुस्ती महापालिकेच्या समाधानार्थ करण्याची जबाबदारी एजंट/ठेकेदार स्विकारीत असून सदर देखभाल व दुरुस्ती करीताचे होणारे सर्व खर्च सदर एजंट/ठेकेदार हेच करतील.



For OM SAI SIDDHI

Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500 FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL
15 MAR 2024

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CK 139813

11 MAR 2024

९) महानगरपालिकेच्या भेट देणा-या अधिका-यांकडून माहिती घेणेसाठी "पैसे भरा आणि वाहन उभे करा" जागेत नोंदवही ठेवण्यास एजंट ठेकेदार यांच्यावर बंधनकारक आहे. वाहनतळावर येणाऱ्या वाहनांचा तपशिल ठेकेदार यांनी दिवसानुसार तसेच महिन्यानुसार अद्यावत करून ठेवणे ठेकेदार यांस बंधनकारक राहील. तसेच सदर जागेवर भेट देण्यासाठी येणा-या महानगरपालिकेच्या कर्मचा-याने मागणी केल्यास सदरचा तपशिल उपलब्ध करून देणे ठेकेदार यांच्यावर बंधनकारक राहिल.

**एफ) अपघात व हानी :**

१) एजंट ठेकेदार मान्य करतो की, सदर वाहनतळाची देखभाल, डागडुजी करताना काही भागाची मोडतोड, नुकसान झाल्यास, किंवा कोणतीही व्यक्ती किंवा त्रयस्तापैकी कोणतीही माणसे जखमी झाल्यास त्याला महापालिका जबाबदार असणार नाही.

२) एजंट/ठेकेदार असे मान्य करतात की, महापालिकेकडून नोटिस मिळाल्यावर ते सदर नोटिस मिळाल्यापासून तीन दिवसांत सदर वाहनतळावर पे ॲन्ड पार्क च्या कामाबाबत झालेल्या दोषांची/कसुरांची दुरुस्ती महानगरपालिकेच्या समाधानार्थ स्वतःचे खर्चाने करतील आणि तसे न केल्यास महानगरपालिका ही कोणतीही पुढील नोटिस किंवा सुचना न देता सदर एजंट/ ठेकेदार यांचेच खर्चाने आणि जबाबदारीवर सदर आवश्यक



For OM SAI SIDDHI

Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500 FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL
15 MAR 2024

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CK 139814

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे
11 MAR 2024
दुय्यक प्रमुख लिपीक / लिपीक

असलेले काम करणेस मुक्त राहील. सदर कामाकरीता झालेला खर्च इसारा रक्कम अथवा सुरक्षा अनामत रक्कमेमधून किंवा दोन्हीमधून वसूल करण्यात येईल.

३) मिरा भाईदर महानगरपालिका, महापालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी यांना कोणत्याही हानी, नुकसान, तोटा यांपासून मुक्त ठेवून नुकसान, तोटा, मोडतोड, खर्च, शुल्क, मागणी, हक्क जे असेल त्याची भरपाई तसेच कामगार भरपाई नियम १९२४ नुसार भरपाईस पात्र असलेल्या नोकरांना, एखाद्या व्यक्तीला दुखापत अथवा महापालिकेच्या संपत्तीला प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष झालेली नुकसान भरपाई, अपघात अथवा अन्य कोणत्याही कारणाने झालेली मोडतोड किंवा जिवीत हानी याची भरपाई देण्याचे एजंट/ठेकेदार मान्य करीत आहे.

**जी) संबंधित प्राधिकरणांची परवानगी:**

सदर एजंट/ठेकेदार हे सदर वाहनतळात पे ॲन्ड पार्क तत्वावर चालविण्यासाठी संबंधित सक्षम प्राधिकारणांची परवानगी/परवानग्या मिळवतील. सदर परवानग्या मिळवणे करीताचे होणारे खर्च आणि त्याचे शुल्क सदर एजंट/ठेकेदार हेच अदा करतील.



For OM SAI SIDDHI

Proprietor

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

15 MAR 2024

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CK 139815

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे

11 MAR 2024

दुय्यम प्रमुख लिपीक / लिपीक

**एच) कराराचे तसेच नियम आणि विनियमांचे अनुपालन करणे :**

१) सदर एजंट/ठेकेदार यांनी या करारानुसार कोणतीही बाब करणेस नकार दिला किंवा हयगय केल्यास अशावेळी महानगरपालिका सदरचे काम करणेसाठी एजंट/ठेकेदारांना नोटिस देईल आणि तरीही सदर एजंट/ठेकेदार यांनी तशी कामे करणेची हयगय केली किंवा नकार दिल्यास अशावेळी सदर एजंट/ठेकेदार यांचेद्वारे पुढे करण्यांत आलेली हयगय किंवा नकारासंबंधात करावयाच्या कारवाई बाबतचे कोणत्याही अन्य अधिकारांना कोणतीही बाधा न येता, नकार दिलेले काम महानगरपालिकेमार्फत करून सदर एजंट ठेकेदार यांचेकडून त्या संबंधातील खर्च वसुल करणेंस मनपास अधिकार राहील.

२) महापालिकेने निश्चित केलेल्या जागेवर (निविदा पुस्तकेतील **जोडपत्र अ**) पे अ‍ॅण्ड पार्क चालविण्यासाठी अडथळा निर्माण झाला किंवा मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भविष्यात विकास कामामध्ये सदर कामाचा अडथळा निर्माण होत असल्यास, सदरच्या जागेतील पे अ‍ॅण्ड पार्क ची योजना रद्द किंवा स्थलांतर करणे हा अधिकार महापालिकेने राखून ठेवला आहे. तो अंतिम राहिल व तो निर्णय एजंट/ठेकेदार यांस बंधनकारक असेल. याबद्दल ठेकेदार महापालिकेकडून नुकसान भरपाई मागणार नाही असे ठेकेदार मान्य करीत आहेत.



**For OM SAI SIDDHI**

Proprietor

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

INDIA NON JUDICIAL

15 MAR 2024

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CK 139816

जिल्हा कार्यालय ठाणे

11 MAR 2024

मुद्रांक मुख्य लिपीक / लिपीक

३) एजंट/ठेकेदार मान्य करतात की, भविष्यात महानगरपालिका, राज्य सरकार, केंद्र सरकारद्वारे कोणतेही नियम कायदयामध्ये पे अॅण्ड पार्कच्या दरांमध्ये करण्यात येणारे सुधार, बदल किंवा फेरफारांचे अनुपालन करण्याची जबाबदारी स्विकारीत आहेत.

४) एजंट/ठेकेदार मान्य करतात की, कंत्राटाच्या कालावधीत दर महिन्यांच्या महसूल रकमेवर चालू दराने वस्तु व सेवा कर मुदतीत भरण्याची जबाबदारी ठेकेदार यांची राहिल. सदर वस्तु व सेवाकराची रक्कम दर महिन्याला महानगरपालिका फंडात जमा करणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे वेळोवेळी लागू झालेल्या वस्तु व सेवाकराच्या दराप्रमाणे सदर कराचा भरणा करणे ठेकेदार यांच्यावर बंधनकारक राहिल. वस्तु व सेवकराचा मूदतीत भरणा न केल्यास, विलंब केल्यामुळे लागणारा व्याज व दंड ठेकेदार यांच्याकडून वसुल करण्यात येईल आणि त्यासाठी ठेकेदार यांनी महापालिकेकडे जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम (security deposit) किंवा तिचा भाग जप्त करण्याची कार्यवाही करणेत येईल.

५) मिरा भाईंदर महानगरपालिकेने वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन करणे एजंट /ठेकेदारास बंधनकारक असेल व ठेकेदार ते मान्य करतात.



For OM SAI SIDDHI

Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500 FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL
15 MAR 2024

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CK 139817

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे
11 MAR 2024
लिपीक

६) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या मधील कावदयांचे पालन व मनपाचे धोरण पालन करण्याची जबाबदारी एजंट/ठेकेदार याची राहील.

**आय) सर्व दावे, कारवाई नुकसानाबाबत एजंट/ठेकेदार यांची जबाबदारी :**

१) या करारादवारे प्रदान करण्यांत आलेल्या वाहन पे ॲन्ड पार्कच्या अधिकारांची अंमलबजावणी करतांना निर्माण होणारे सर्व दावे, कारवाई, मागण्या, नुकसान, याबद्दल सर्वस्वी जबाबदारी एजंट ठेकेदाराची राहील.

२) पे ॲन्ड पार्कच्या कामासंदर्भात कोणत्याही व्यक्तींना किंवा महानगरपालिकेच्या मालमत्तेस किंवा अन्य व्यक्तींना कोणतीही हानी, नुकसान, दुखापत/इजा किंवा जिवित हानी झाल्यास त्याकरीता सदर एजंट/ठेकेदार हे एकटेच जबाबदार राहतील आणि अशा प्रकारचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष झालेल्या जिवित किंवा मालमत्तेच्या हानीपासून सदर एजंट/ ठेकेदार हे महानगरपालिकस पूर्णतः दोषमुक्त ठेवतील.

३) या कराराचे मुदतीत कोणत्याही वेळी संप, टाळेबंदी, संचारबंदी, साहित्याचा तुटवडा, युध्द, आग, पुर, महामारी, संसर्गिक रोग किंवा कोणतीही सरकारी अधिनियमिती किंवा विनिमय किंवा महानगरपालिकेच्या नियंत्रणाबाहेरील अशा कोणत्याही इतर कारणास्तव



For OM SAI SIDDHI
Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500 FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL
15 MAR 2024

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CK 139818

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे
11 MAR 2024
दुय्यम प्रमुख लिपीक / लिपीक

या करारात नमुद केलेल्या अटी आणि शर्तीनुसार कराराची पुर्तता करणे अशक्य झाल्यास सदर एजंट/ठेकेदार यांना कराराची पुर्तता करणेंस झालेली असमर्थता या संबंधात महानगरपालिकेकडे कोणताही दावा करणेचा अधिकार राहणार नाही व त्याचद्दलचे नुकसान मनपाकडे मागता येणार नाही.

**जे) अधिदानाच्या / महसूलाच्या (Payment) अटी व अनुसूची:**

1) ठेकेदार हे मान्य करीत आहेत की, करारनामा झालेल्या तारखेपासून तीस दिवसानंतर येणा-या महिन्याच्या सात दिवसांच्या आत ठेकेदार यांनी प्रथम महसूल रक्कमेचा मासिक हप्ता रुपये 7,91,667/- (अक्षरी रुपये सात लाख एक्क्याण्णव हजार सहाशे सदुसष्ट मात्र) एवढी मनपामध्ये भरणा करावी तदनंतर उदा. माहे मे या महिन्याचा होणारा मासिक महसूल माहे जून १ ते ७ तारखेपर्यंत महापालिकेत भरणा करावा (सुट्टीचे दिवस वगळून) तसेच ठेकेदार हे मान्य करतात की, माहे मार्च महिन्यांची महसूल रक्कम त्याच महिन्यांच्या 15 तारखेपर्यंत महानगरपालिकेमध्ये भरतील, ठेकेदार यांनी वरील नमूद मासिक हप्ताच्या रक्कमेचे व वस्तु व सेवा कराच्या रक्कमेचे असे २४ धनादेश 'मिरा-



For OM SAI SIDDHI

Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500
FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये
सत्यमेव जयते
Rs. 500
INDIA NON JUDICIAL
15 MAR 2024

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CK 139819

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे
11 MAR 2024
मुद्रांक प्रमुख लिपीक / लिपीक

जिल्हा कोषागार कार्यालय ठाणे

भाईदर महानगरपालिकेच्या' नावे आगाऊ स्वरुपात महानगरपालिकेकडे कार्यादेश मिळाल्यापासुन सात दिवसांत सादर करावेत. वस्तु व सेवा करासाठी १८टक्के नुसार (जीएसटी) मासिक हप्ता रक्कम रुपये 1,42,500/- (अक्षरी रुपये सात लाख बेचाळीस हजार पाचशे मात्र)महानगरपालिकेच्या नावे स्वतंत्र धनादेश (एकूण १२) ठेकेदार यांनी सादर करावेत

2) करारनाम्याच्या अटीशर्तीनुसार व मा. प्रशासकीय सभेने दिलेल्या मंजुरी प्रमाणे पे ॲन्ड पार्क योजनेमधून प्राप्त होणारी मासिक महसूल रक्कमेप्रमाणे एजंट/ठेकेदार हे वार्षिक रक्कमेचा मनपामध्ये भरणा करतील.

3) सर्व अधिदाने/महसूल रक्कम (Payment) ही रोख किंवा मिरा भाईदर महानगरपालिकेच्या नावाने कोणत्याही शेडयुल/राष्ट्रीयकृत बँकेवर काढलेल्या 'अकाऊंट पेयी ओन्ली' धनादेशाद्वारे देण्यात यावी.

4) सदर कराराचे मुदतीत सदर एजंट/ठेकेदार हे महानगरपालिकेच्या कोणत्याही कामापासून किंवा कोणत्याही अदृश्य कारणांपासून किंवा अन्य आधारांवर काम करण्यास अडथळा निर्माण होण्याच्या कोणत्याही कारणांस्तव असल्यास,



For OM SAI SIDDHI
Proprietor

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

15 MAR 2024

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CK 139820

11 MAR 2024

मुद्रांक प्रमुख लिपीक / लिपीक

कोणताही दावा महानगरपालिकेकडे करणेस ठेकेदार यांना अधिकार राहणार नाहीत.

5) मुद्दा क्र.१ मध्ये नमुद केल्याप्रमाणे एजंट/ठेकेदार यांनी मुदतीत महसूल रक्कम देण्यास कसुर केल्यास, सदर महानगरपालिकेकडे अन्य कायदेशीर उपाययोजना खुल्या असल्यातरी सदर एजंट/ ठेकेदार हयांनी सदर मासिक हप्त्याची रक्कम देय झाल्याच्या दिनांकापासून ते सदर रक्कम महानगरपालिकेस ज्यादिवशी मिळाली त्या दिवसापर्यंत (दोन्ही दिवस मिळून) दरसाल १८ टक्के दराने व्याज दयावे लागेल आणि अशी रक्कम ठेकेदार यांनी सलग २ महिने महानगरपालिकेस अदा न केल्यास महानगरपालिकेस सदरचा करारनामा रदद करण्याचे अधिकार राहिल आणि अशावेळी सदर एजंट/ठेकेदार यांनी जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम (सिक्युरीटी डिपॉझिट) किंवा इसारा रक्कम किंवा दोन्हीही जप्त करणेंचा अधिकार महापालिकेस राहील व काळ्या यादीत टाकून गुन्हा दाखल करण्यात येईल

6) जर सदर एजंट/ठेकेदार हे ठेक्याचे काम सुरू करू शकले नाहीत, महानगरपालिकेस सदर करार रद्द करण्याचा व ठेकेदार यांनी महापालिकेकडे



For OM SAI SIDDHI

Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500 FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL
15 MAR 2024

महाराष्ट्र MAHARASHTRA © 2023 ©    CK 139821

ठाणे
11 MAR 2024
लिपीक

जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम किंवा इसारा रक्कम किंवा दोन्ही जप्त करण्याचा अधिकार महानगरपालिकेस राहील.

**के) एजंट/ची दिवाळखोरी किंवा एजंट/द्वारे कराराच्या अटींचे पालन न करणे :-**

१) जर सदर एजंट/ठेकेदार यांनी दिवाळखोरीची कोणतीही कृती केली किंवा दिवाळखोर घोषित झाल्यास किंवा त्यांचे विरुध्द विघटनाची कारवाई केली गेली किंवा स्वतः किंवा न्यायालयाचे निर्देशांना अधीन राहून केलेल विघटन किंवा एजंट ठेकेदार यांना या करारा अंतर्गतचे देय रकमेबाबत जप्ती कारवाहींचा सामना करावा लागल्यास किंवा महानगरपालिकेस देय असणाऱ्या रकमांचा भार सदर करारावर किंवा ठेक्यावर आल्यास किंवा त्यांचे क्रेडीटर्स बरोबर समेट केल्यास किंवा सदर एजंट/ठेकेदार यांनी या करारातील किंवा त्याच्या कोणत्याही भागातील अटी आणि नियमांचे पालन करणेत कसूर केली तर अशावेळी महानगरपालिका ही सदर एजंट/ठेकेदार यांचेद्वारे झालेले उल्लघंन किंवा कसुर, याकरीता देय हप्ता किंवा मोबदला रूपाने किंवा नुकसान म्हणून सर्व रकमा वसूल करणेंच्या तिच्या अधिकारांना कोणतीही बाधा न करता सदर करारनामा रद्द करणेस अधिकार राहील.



For OM SAI SIDDHI

Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500
FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये
सत्यमेव जयते
Rs. 500
15 MAR 2024
INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CK 139822

11 MAR 2024

**एल) प्रतिभूली ठेव (सिक्युरीटी डिपॉझिट)**

१) महापालिकासोबत झालेल्या सदर कराराच्या तारखेपासून ७ दिवसांत ठेकेदार (बिल्डर्स) हे महापालिकेकडे प्रतिभूती ठेव रक्कम (सिक्युरीटी डिपॉझिट) अदा करतील, त्याचप्रमाणे ठेकेदार यांनी निविदेसोबत महानगरपालिकेकडे जमा केलेली इसारा रक्कम प्रतिभूती ठेव रक्कम म्हणून समजण्यात येईल. (कराराची मुदत संपल्यानंतर पुढील १ वर्षानंतर सदर इसारा रक्कमेचा परतावा मिळणेकरीता ठेकेदार यांना महानगरपालिकेकडे मागणी करावी लागेल.) सदर प्रतिभूती ठेव रक्कम ही एजंट/ ठेकेदार यांनी बिड बी फॉर्ममध्ये दर्शविलेला वार्षिक महसूल रक्कमेच्या २५ टक्के म्हणजेच रु. 25,75,000/- (अक्षरी पंचवीस लाख पंच्याहत्तर हजार रूपये) इतकी असेल. सदर सिक्युरिटी डिपॉझिटसाठी होणारी रक्कम बँक गॅरंटी स्वरुपात भरणा करण्यांत यावा. सदर प्रतिभूती ठेव रक्कम (सिक्युरीटी डिपॉझिट) कोणत्याही राष्ट्रीयकृत/शेडयुल्ड बँकेच्या बँक गैरटी स्वरुपात महापालिका यांचे नावांने देतील.

२) सुरक्षा अनामत रक्कम (सिक्युरीटी डिपॉझिट) परत करणे :-



For OM SAI SIDDHI
Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500 FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL
15 MAR 2024

महाराष्ट्र MAHARASHTRA 2023

CK 139823

13 MAR 2024
प्रमुख लिपीक / लिपीक

सुरक्षा अनामत (सिक्युरीटी डिपॉझिट) रक्कमेवर व्याज दिले जाणार नाही. सदर कराराचा कालावधी संपल्यानंतर पुढील 1 वर्षाकरीता सदर सुरक्षा अनामत रक्कम वैध राहिल.

३) सदर कराराचा कालावधी म्हणजेच 2 वर्षानंतर देखिल वाढविण्याचा निर्णय दोन्ही पक्षांनी घेतल्यास ठेकेदार यांना वाढीव मुदतीकरीता सुरक्षा अनामत रक्कम (सिक्युरीटी डिपॉझिट) देणेस बंधनकारक राहील.

४) प्रतिभूती ठेव रक्कम (सिक्युरीटी डिपॉझिट) जप्त करणे :-
संपूर्ण प्रतिभूती ठेव रक्कम (सिक्युरीटी डिपॉझिट) किंवा तिचा कोणताही भाग हा सदर एजंट/ठेकेदार यांनी सदर कराराच्या अटी आणि शर्तीचे पालन करणे कसूर केल्यास किंवा त्याच्या आवश्यकताची पुर्तता/पालन न केल्यास सदर एजंट/ठेकेदार यांचे विरुध्द सदर महानगरपालिकेस असलेले दावे व अधिकार यांना कोणतीही बाधा न आणता ती प्रतिभूती ठेव (सिक्युरीटी डिपॉझिट) किंचा तिचा भाग हा जप्त होणेस पात्र असेल.



For OM SAI SIDDHI
Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500 FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL
15 MAR 2024

महाराष्ट्र MAHARASHTRA © 2023 © CK 139824

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे
11 MAR 2024
प्रमुख लिपीक / लिपीक

**एम) एजंटच्या सर्व जबाबदारीचे धोरण (सी. ए. आर.)-**

सदर एजंट/तेकेदार यांनी या करारात नमुद केलेल्या अटीशर्तीनुसार काम करण्यास नकार दिल्यास किंवा काम मुदतीपूर्ण सोडल्यास किया महानगरपालिकेने सुचना दिल्यानुसार काम न केल्यास, सदरचे काम महानगरपालिका स्वतः किवा इतर ठेकेदारामार्फत सवरचे काम पूर्ण करील व सदरचे काम पूर्ण करणेकरीता झालेला पूर्ण खर्च किंवा फरकाची रक्कम या करारनाम्यातील एजंट/ठेकेदार यांच्याकडून वसूल करण्यात येईल.

**एन) क्षतिपूर्ती (इन्डेमनीटी)-**

१) सदर एजंट ठेकेदार हे पे ॲन्ड पार्क करण्याच्या कामांपासून महापालिका यांचे कोणत्याही मालमत्तेस हानी किंवा नुकसान होणे किंवा वर्कमेन कॉम्पकन्सेशन ॲक्ट अंतर्गत केलेले किंवा करण्यात येतील असे सर्व दावे, कारवाई मागणी यापासून किंवा कोणाही अन्य व्यक्तींचा मृत्यू अंपगत्व किंवा दुखापत यापासून निर्माण होणारे दावे यापासून महापालिकेला सर्वत्तोपरी दोषमुक्त ठेवण्याची हमी देत आहोत. आणि सदर संबंधातील सर्व खर्च, आकार किंवा दाव्याचे योग्य प्रकारे मुल्यमापन करुन सदर एजंट ठेकेदार हे महापालिकेने मागणी केल्यावर तात्काळ भरपाई करून देतील.



For OM SAI SIDDHI
Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500 FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL
15 MAR 2024

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CK 139825

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे
11 MAR 2024
मुद्रांक प्रमुख लिपीक / लिपीक

२) एजंट/ठेकेदार यांचेद्वारे झालेल्या कायदयाच्या उल्लघंनापासून महापालिका यांना दोषमुक्त ठेवणे. एजंट/ठेकेदार यांचेकडून सदर कराराच्या किंवा ठेक्याच्या मुदतीत कायद्याच्या विरुध्द असतील अशा पे ॲन्ड पार्कच्या कामासंबंधात राज्य किंवा केंद्रसरकार किंवा स्थानिक प्राधिकरणे यांच्या कोणत्याही कायद्याचे किंवा नियम वगैरेचे उल्लघंन झाल्यामुळे आकारण्यात किंवा लादण्यात येणारे दंड, शिक्षा, आणि इतर खर्च वगैरे पासून महापालिका यांना सर्वतोपरी दोषमुक्त ठेवण्याची हमी देत आहेत.

३) २)सदर एजंट/ठेकेदार हे सर्व कॉन्ट्रॅक्ट लेबर (रेग्युलेशन ॲन्ड ऑपरेशन) कायदा व नियम तसेच मिनिमम वेजेस ॲक्ट, बाल मजुर कायदा, इतर लेबर लॉ यासहित सर्व संविधी/पारिनियमांचे पालन करतील आणि सदर कायद्यापासून निर्माण होणारे सर्व दावे, कारवाई यापासून महापालिका यांना सर्वतोपरी दोषमुक्त ठेवतील.

**ओ) एजेंट यांना महानगरपालिकेचे सहाय्य -**

महानगरपालिका सदर ठेकेवार/एजंट यांचेचरोबर अशी प्रसंविदा करते की, सदर एजंट/ठेकेदार यांनी या करारातील सर्व अटी आणि शर्तीचे पालन केले आणि सर्व देव रकमा अदा केल्यावर त्यांना कोणत्याही अडथळा किंवा व्यत्ययाविना पे ॲन्ड पार्कचे काम करणेस अधिकार राहील, जेथे आवश्यकता असेल त्या ठिकाणी सदर महानगरपालिका एजंट ठेकेदार यांचे खर्चाने सदर



For OM SAI SIDDHI
Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500
FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये
Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL

15 MAR 2024

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CK 139826

11 MAR 2024

एजंट ठेकेदार यांचे अधिकारांना अडथळा किंवा व्यत्यय निर्माण करणारे किंवा हस्तक्षेप करणारे व्यक्तीविरुध्द योग्य कारवाई करणेंस सहकार्य करील.

**पी) ठेका रद्द करण्याची नोटिस -**

१) सदर करार/ठेक्याच्या मुदतीत सदर एजंट ठेकेदार यांचे व्यवस्थापन किवा प्रतिनिधी यांचे बाबत महानगरपालिका असमाधानी होईल असे कोणतेही कारण घडल्यास किंवा निविदा पत्रिकामध्ये नमूद खालील बाबींचे तक्रार प्राप्त झाल्यास एजंट/ठेकेदार यांना महानगरपालिकेकडून दंड आकारण्यात येईल.

१) अनुसूची -१

१. साईट अटेंडन्ट / सुरक्षा रक्षक हे गणवेश/ ओळख पत्राशिवाय असल्यास रु.१०००/-

२. पार्कीग बेज न रंगविल्यास रु.२०००/-

३. ठेकेदाराचे नांव, दर सुची, दर्शविणारास बोर्ड न लावल्सास रु.२०००/-

४. वाहने शिस्तीने पार्क न केल्यास रु.१०००/-(प्रती दिन)



For OM SAI SIDDHI

Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500 FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL
15 MAR 2024

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CK 139827

11 MAR 2024

५. साईट चौकीवर माहिती पुस्तिका न ठेवल्यास रु.१०००/-

६. निश्चित दरापेक्षा जास्त दर आकारीत असल्याचे आढळल्यास रु.२०००/-प्रती वाहन

७. पार्कीगची जागा स्वच्छ न ठेवल्यास रु.१०००/-

सदर दंडाची रक्कम एकुण निविदा रकमेच्या ५ टक्केच्या वर गेल्यास, अशावेळी महानगरपालिका एजंट/ठेकेदार यांना लेखी नोटिस देवून सदर नोटिसमध्ये नमुद केलेल्या असमाधानाबाबतच्या त्रुटीचे खुलासा करणेंस सांगेल. सदर एजंट/ठेकेदार हे नोटिस प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या काळात अशा असमाधानाबाबतच्या कारणांची दुरुस्ती महानगरपालिकेच्या समाधानार्थ दूर करू शकले नाहीत. तर अशावेळी याउलट सदर करारात काहीही नमुद केले असले तरी महानगरपालिकेस एजंट/ठेकेदार यांना १५ दिवसांची पूर्व नोटिस देऊन सदर करारनामा रद्द करण्याचा महापालिकेला अधिकार राहतील. करारनामा रद्द केल्यानंतर लगेचच महानगरपालिकेमार्फत सदर पे ॲण्ड पार्कच्या जागेचा ताबा घेण्यात येईल.



For OM SAI SIDDHI

Proprietor

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

15 MAR 2024

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CK 139828

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे

15 MAR 2024

मुद्रांक प्रमुख लिपीक / लिपीक

२) पहिला महसुलाचा हप्ता देण्यास कसूर केल्यास किंवा सदर एजंट ठेकेदार यांनी माघार घेतली किंवा ठेका सुरु केला नाही. अशावेळी एजंट ठेकेदार यांना ७ दिवसांची पूर्व लेखी सुचना देवून ठेका रद्द करणेचा अधिकार असेल आणि सदर सुचनेचा काळ संपल्यावर सदर करारनामा रदद होईल आणि सदर एजंट ठेकेदार यांची ई.एम.डी. किवा प्रतिभूती ठेव रक्कम किंवा दोन्हीही जप्त केल्या जातील.

३) .सदर एजंट ठेकेदार यांनी करारातील कोणत्याही अटीचे उल्लघंन केले किंवा महापालिका यांना देय असलेली रक्कम देणेस कसूरवार ठरल्याने, कायद्याने तो त्याची कर्ज चुकती करू शकत नाही असे मानले गेल्यास म्हणजेच दिवाळखोर घोषित केल्यास किंवा सदर कंपनीचे व्यवहारांचे समायोजनाबाबत ठराव मंजुर किंवा पास करण्यात आल्यास अशावेळी महापालिका ही सदर एजंट ठेकेदार यांना नोटिस देवून सदर एजंट ठेकेदार यांना या कराराअंतर्गतच्या कोणत्याही जबाबदारी किंवा दायित्वापासून मुक्त न करता किंवा महापालिका यांना दिलेले अधिकार आणि प्राधिकारांना कोणतीही बाधा न करता सदर करार रद्द करतील आणि सदर ठेक्याचे काम पूर्ण करणे करीता अन्य एजंट ठेकेदार यांना नियुक्त करतील.



For OM SAI SIDDHI

Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500 FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL
15 MAR 2024

महाराष्ट्र MAHARASHTRA 2023 CK 139829

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे
11 MAR 2024
प्रमुख लिपीक / लिपीक

४) एजंट/ठेकेदाराने पे ॲन्ड पार्कची सुविधी पुरविण्याबाबतचा कालावधी या कराराच्या कालावधी पुरतेच करावे.

५) सदर करारनामा रद्द झालेवर महापालिका ही तिचे प्रमाणकानुसार सदर एजंट/ठेकेदार यांचेकडून येणे असलेली रक्कम व/किंवा भरपाई म्हणून वसूल करावयाच्या रकमेचे मुल्यांकन करील, अशी रक्कम महापालिका ठेकेदार यांचे प्रतिभूती ठेव रकमेतून किंवा या कराराअंतर्गत ठेकेदार यांनी भरणा केलेल्या अन्य कोणत्याही रक्कमेतून किंवा महापालिका यांचे बरोबर केलेला इतर करार किंवा ठेका व सामानाच्या जप्ती याद्वारे किंवा इतर मार्गाने वसूल करील.

**क्यु) ठेका पूर्णतः किंवा अंशतः मुदतीपुर्व रद्द करणे :-**

१) कोणत्याही वेळी महानगरपालिकेने जर सर्व किंवा कोणत्याही पे ॲन्ड पार्कची जागा (निविदेत विनिर्दिष्ट केल्यानूसार) कोणत्याही कारणांस्तव मागे घेणेचे ठरविल्यास आणि अशा कोणत्याही किंवा सर्व जागा मनपास आवश्यक असल्यास अशावेळी महानगरपालिका १५ दिवसांची पूर्व सूचना देवून सदर करार मुदतीपूर्वी रद्द करील अशाप्रकारे मुदतपुर्व करार रद्द करतेवेळी सदर एजंट/ठेकेदार यांना सदर करार अकस्मात रद्द केल्याच्या कारणांस्तव महानगरपालिकेच्या विरुध्द कोणत्याही भरपाईचा दावा



For OM SAI SIDDHI
Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500
FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये
Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL
15 MAR 2024

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CK 139830

11 MAR 2024

करणेस अधिकार राहणार नाहीत व करार खंडीत करणेच्या तारखेपर्यंत वापरण्यात आलेल्या पे अॅन्ड पार्कचा हप्ता महानगरपालिकेस अदा करील. सदर ठेक्याचा कालावधी संपुष्टात आल्यास किंवा सदरचा करारनामा रद्द झाल्यास (मुदतपूर्वी) ठेकेदार महापालिकेस पे अँड पार्कच्या जागेचा ताबा (Peaceful and vacant session) परत करील. सदर ठेका समाप्तीनंतर ठेकेदार यांनी सदर जागेचा ताबा देण्यास कसूर केल्यास, सदर जागेतून महापालिका ठेकेदारास अतिक्रमण (Encroach) समजून काढून टाकील आणि सदर कारवाई करीत असताना ठेकेदाराच्या कोणत्याही मालमत्तेस हावी झाल्यास त्यास महापालिका अधाबवार राहणार नाही.

२) एजेंट/ठेकेदार असे मान्य करतो की, जर सवर जागा महापालिकेला वापरात द्यावी लागली किंवा महापालिकेच्या काही कारणास्तव बंद करावी लागली तर महापालिकेस मुदती आधी करार संपविण्याची मुभा राहील. त्यावेळी एजंट / ठेकेदार सर्व जगा खाली करून देईल. व त्यासाठी कोणतीही मोडतोड भरपाई किंवा नुकसान शुल्क मागणी आणि पर्यायी जागेची मागणी करू शकणार नाही. तथापि वाहन तळ ज्याविचसी बंद होईल तोपर्यतचे होणारे महसूल भरावे लागेल.



For OM SAI SIDDHI

Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500 FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL
15 MAR 2024

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CK 139831

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे
11 MAR 2024
दुय्यम प्रमुख लिपीक / लिपीक

३) कराराची मुदत संपताच किंवा मुदतपूर्ण करार संपविल्यास वाहनतळाची जागा एजंट/ ठेकेदार शांतपणे रिकामी करून त्वरीत मनपास जागेचा ताबा हस्तांतरीत करण्याचे मान्य करीत आहेत.

**आर) वादाचा निवाडा :-**

एम.बी.एम.सी आणि एजंट ठेकेदार यांचेमध्ये या करारा संबंधातील कोणत्याही प्रकरणावरून कोणताही वाद निर्माण झाला किंवा सदर कराराच्या मुदतीमध्ये किंवा करार पुर्ण झाल्यावर कोणताही वाद निर्माण झाल्यास तो वाद मिटवणेकरीता मा.न्यायालय, ठाणे येथे दाद मागता येईल.

**एस) सामान्य अट (General Condition) :-**

१) ठेकेदार मान्य करतो की, मनपाने वाहनतळाच्या जागेत एखाद्या व्यक्तीला किंवा कंपनीला मोबाईल ॲडव्हटायजिंग व्हॅन ही उभी करून जाहिरात करण्याकरीता परवानगी दिल्यास ठेकेदार सदर वाहनांवरील फक्त मनपाने मंजुर केलेल्या पे पार्कसाठी ठरविण्यात आलेल्या दरपत्रकानुसार शुल्क आकारेल. तसेच तेकेदार यांना सदर पाहन मालकांकडून जाहिरातीचा कोणताही मोबदला वसूल करण्याचा अधिकार राहणार नाही.



For OM SAI SIDDHI
Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500 FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL

15 MAR 2024

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CK 139832

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे
11 MAR 2024
मुद्रांक प्रमुख लिपीक / लिपीक

२) ठेकेदार मान्य करतो की, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम अन्यये सदर करारनाम्यावर होणारी स्टॅम्प डयुटी भरण्याची करून घेण्याची जबाबदारी ठेकेदार यांची राहील.

३) निविदा दस्तावेज व कार्यादेश हे करारनाम्याचे भाग राहतील.

महापालिकायांचेकडे निविदा फॉर्म सोबत सादर केलेले सर्व दस्ताऐवज व निविदा या कराराचा/ठेक्याचा एक भाग मानला जाईल. त्याचे तंतोतंत पालन करणे एजंट/ठेकेदार ची जबाबदारी राहील, सदर करारनामा व निविदा यांच्या वाक्यरचनेमध्ये काही विसंगती आढळून आल्यास सदर करारनाम्यातील अटीशर्ती एजंट/ठेकेदार यांना लागू राहतील.

यातील साक्षीत नमुद केलेले पक्षकार व साक्षीदार यांनी या करारात माहे मार्च 2024 या वर्षी समक्ष स्वाक्षरी केली आहे. यांतील नमुद केलेले पहिले पक्षकार

मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे करीता उप-आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी समक्ष सही केली आहे.

साक्षीदार

१.

२.



For OM SAI SIDDHI

Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500
FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये
सत्यमेव जयते
Rs. 500
INDIA NON JUDICIAL

15 MAR 2024

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CK 139833

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे
11 MAR 2024
मुख्य प्रमुख लिपीक / लिपीक

सदर कामी निविदेतील मुल्याधारित रक्कम रु. १,०७,४८,८००/- ठेकेदाराने भरणा केलेली मुल्याधारित रक्कम रु. १,८७,११,३५२/- मुद्रांक शुल्क रु. १८,५००/- (अठरा हजार पाचशे रु. मात्र)

उप-आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका

यांतील नमुद केलेले दुसरे पक्षकार

मे. ओम साई सिध्दी
शॉप नं १२, किंजल ला विस्टा अपार्ट,
पुनम सागर कॉम्पलेक्स,
मिरारोड पुर्व ४०११०७

For OM SAI SIDDHI
Proprietor

(एजंट / ठेकेदार)

मे. ओम साई सिध्दी यांनी समक्ष स्वाक्षरी केली आहे.

सन २०२४ /२०२५ करारनामा नोंदवही अनु क्र ४२ दि.१८/०७/२४ अन्वये नोंद करणेत आली

महापालिका सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

साक्षीदार :-

१. डॉ संभाजी पानपट्टे - अति. आयुक्त

२. रवि पवार - उपायुक्त (मु.)

MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION
Secretary Dept.
Head Office
Bhaindar (W)



For OM SAI SIDDHI
Proprietor